ठिकाण– दिवाणी न्यायालय,कोरेगाव
दिनांक – १६/१०/२०२३

## फेर **निविदा**

**दिवाणी न्यायालय ,कोरेगांव** या कार्यालयातील झेरॉक्स/नकलेचे काम बाहययंत्रणेव्दारे (Outsourcing) करुन घेणेसाठी सेवा पुरवठादार यांचेकडून निविदा मागविणेत येत आहेत.

तरी इच्छुक सेवा पुरवठादार यांनी त्यांच्या निविदा सिलबंद लखोटयामध्ये **दिवाणी न्यायाधिश क.स्तर तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव** यांचे नावे "**झेरॉक्स/नकलेचे काम बाहययंत्रणेव्दारे (Outsourcing) करुन घेणेसाठी निविदा** " असा स्पष्ट उल्लेख लखोटयावर करुन पुढील **१०** दिवसांत म्हणजेच दिनांक **२५/१०/२०२३** रोजी अगर त्यापुर्वी **दिवाणी न्यायालय कोरेगांव** या कार्यालयामध्ये सादर कराव्यात. सिलबंद निविदेवर आपल्या फर्मचे नांव,सविस्तर पत्ता, संपर्क नंबर असणे अत्यावश्यक आहे.

अटी व शर्ती –

**अ)** ए–४, लिगल साइज (फुलस्केप) व ए–३ अशा तीनही आकाराच्या कागदांच्या प्रत्येक प्रतींसाठीचा दर नमुद करणे आवश्यक, झेरॉक्सच्या प्रती या स्वच्छ व स्पष्ट असणे आवश्यक आहेत.

**ब)** झेरॉक्स मशीन सेवापुरवठादार यांनी स्वखर्चाने स्थापित (Install) करणेची आहे.

**क)** सदर झेरॉक्स मशीनची देखभाल व दुरुस्ती तसेच कागद विद्युत देयक व ऑपरेटर या बाबींचा खर्च कंत्राटदार यांनी करणेचा आहे.

**ड)** सेवा पुरवठादार यांनी विनाशर्त रक्कम रुपये ५,०००/– चे बँक हमी बंदपत्र (Bank Guarantee Bond) सादर करणे आवश्यक आहे.

**इ)** सेवा पुरवठादार यांनी सदरील झेरॉक्स मशीनमुळे भोवतालच्या जागेमध्ये संभाव्य नुकसान/ तेथे उपस्थित लोकांना संभाव्य इजा / दुखापत इ. या दृष्टीने विमा पॉलीसी उतरविणे आवश्यक आहे.

सेवा पुरवठादार यांचे सोबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील वेळोवेळी निर्देशान्वये प्राप्त झालेल्या अटी व शर्तींना अधीन राहून सेवा करार करणेत येईल. सदरील करार हा अमलात आलेच्या तारखेपासुन पुढील एक वर्षासाठी अस्तित्वात राहील.

16/10/23

दिवाणी न्यायाधिश क.स्तर, तथा
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोरेगांव

प्रत,

१. दिवाणी न्यायालय क.स्तर कोरेगाव न्यायालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी
२. दिवाणी न्यायालय, कोरेगाव वकील बार असोशिएशन नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी
३. स्थानिक सर्व शासकीय कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी
४. संगणक कक्ष, जिल्हा न्यायालय, सातारा -संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी